THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 3RD DECEMBER 1896.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### रेव्हिन्यू डिपार्टमेंट.

मुक्काम जंजिरे मुंबई, तारीख १३ वी नोव्हेंबर, सन १८९६.

### जाहिरनामा.

**नंबर ८९८०.**—सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट, नंबर १२ वा, याचें कलम ८ (१), रकम (क), यावरून दिलेले अधिकार चालवून मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांनीं, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची पूर्वीं मंजुरी घेऊन, मुंबई इलाक्यांत जलमार्गानें पिट्रोलियम आणण्याच्या कामाचें नियमन करण्याबाबद ज्या कानू, सन १८९०चें मुंबई सरकारी ग्याझेट, भाग १ ला, याच्या ३४१ पासून ३४४ पर्यंत पृष्ठांवर प्रसिद्ध केलेला जाहिरनामा नंबर २७४३, तारीख २२ वी एप्रील सन १८९०, यांत दिल्या आहेत त्या कानूंपैकीं १७ व्या कानूच्या बदला खालीं लिहिलेली कानू करण्याचें योजिलें आहे. ज्या मनुष्यांना त्या कानूस कोणत्याहि हरकती घेणें असतील त्यांनीं त्या, या जाहिरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आंत, आक्टिंग चीफ सेक्रेटरी निसबत सरकार, रेव्हिन्यू डिपार्टमेंट, यांजकडे पाठवाव्या:—

मालाच्या बोटींवर तंबाखू वगैरे ओढण्याची व आग वगैरेचा उपयोग करण्याची, आणि दिवा उघडा असल्यास त्याचा, लैसेन्स मिळालेल्या जागांमध्यें, उपयोग करण्याची मनाई आहे.

खालीं सांगितलेल्या जागीं तंबाखू वगैरे ओढण्याची आणि कोणत्याहि आगीचा किंवा दिव्याचा उपयोग करण्याची मनाई आहे, ह्मणजे—

(अ) पिट्रोलियम जमिनीवर उतरण्याकरितां किंवा एका तारवावरून दुसऱ्या तारवावर चढविण्याकरितां ज्या कोणत्याहि बोटीचा उपयोग करण्यांत येत असेल त्या बोटीवर, आणि

(ब) पिट्रोलियम मोठ्या प्रमाणानें सांठवून ठेवण्याकरितां लैसेन्स मिळालेल्या कोणत्याहि जागेंत किंवा आवारांत; मात्र अशा जागेंत किंवा आवारांत दिव्याचा उपयोग करणें असेल त्या प्रसंगीं तो दिवा उघडा नसतां सुरक्षित असला पाहिजे.

(सही) जी. एस. कर्टिस,
अण्डर सेक्रेटरी निसबत सरकार.

(True Translation)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.



BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.